सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.१६/का.११
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२८७६२२६. ई-मेल sec.mh@gov.in
दिनांक: १६ जुलै २०२४

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
महानगरपालिका आयुक्त (सर्व).

**विषय: राजकीय पक्षांचा दर्जा व निवडणूक चिन्हांमधील बदलांबाबत...**

**संदर्भ:** १) राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेले दि.३० नोव्हेंबर २०१९ रोजीची राजकीय पक्ष व चिन्हांची यादी.
२) भारत निवडणूक आयोगाचे दि.१० ऑक्टोबर २०२२ आणि दि.१७ फेब्रुवारी २०२३ रोजीचे आदेश.
३) भारत निवडणूक आयोगाची दि.२३ व दि.२६ मार्च २०२४ रोजीचे राजकीय पक्षांच्या यादीसंदर्भातील अधिसूचना.
४) भारत निवडणूक आयोगाचे दि.०६ फेब्रुवारी २०२४, दि.०७ फेब्रुवारी २०२४, दि.२२ फेब्रुवारी २०२४ आणि दि. ०८ जुलै २०२४ रोजीचे आदेश.

महोदय/ महोदया,

'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९' च्या परिच्छेद १० नुसार राज्य निवडणूक आयोगाकडून चिन्हांची सूची असलेली अधिसूचना प्रसिद्ध केली जाते. त्यात राष्ट्रीय पक्ष, राज्यस्तरीय पक्ष आणि इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष व त्यांची चिन्हे; तसेच राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत राजकीय पक्षांची नावे आणि मुक्त चिन्हांच्या यादीचा समावेश असतो. अशा प्रकारची अलीकडची अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाकडून दि. ३० नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भांनुसार दि. ३० नोव्हेंबर २०१९ रोजीच्या अधिसूचनेत पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत:

१. 'नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी' या पक्षाचा समावेश आता राष्ट्रीय पक्षांच्या यादी ऐवजी महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय पक्षांच्या यादीत करण्यात आला आहे. या पक्षाचे चिन्ह 'घड्याळ' (Clock) आहे.

२. ‘भारतीय कम्युनिस्ट पक्ष’ या पक्षाचा समावेश आता राष्ट्रीय पक्षांच्या यादी ऐवजी इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांच्या यादीत करण्यात आला आहे. या पक्षाचे चिन्ह ‘कणीस आणि विळा’ (Ears of Corn and Sickle) आहे.

३. ‘आम आदमी पार्टी’ या पक्षाचा समावेश इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांच्या यादी ऐवजी राष्ट्रीय पक्षांच्या यादीत करण्यात आला आहे. या पक्षाचे चिन्ह ‘झाडू’ (Broom) आहे.

४. महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय पक्षांच्या यादीत आता ‘शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)’ या पक्षाचा समावेश करण्यात आला असून या पक्षाचे चिन्ह ‘मशाल’ (Flaming Torch) आहे (सोबतचे परिशिष्ट- १) प्रमाणे.

५. महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय पक्षांच्या यादीत आता ‘राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार’ पक्षाचा समावेश करण्यात आला असून या पक्षाचे चिन्ह ‘तुतारी वाजवणारा माणूस’(Man Blowing Turha) आहे (सोबतचे परिशिष्ट- २) प्रमाणे.

६. दि. ३० नोव्हेंबर २०१९ च्या अधिसूचनेतील परिशिष्ट- तीन मधील अ.क्र.१७२ वरील ‘बिगुल’ (Trumpet) आणि अ.क्र. १७३ वरील तुतारी (Turha) ही मुक्त चिन्हे गोठविण्यात येत आहेत.

शिवसेना आणि नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टीसंदर्भातील बदल मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या निकालाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

वरील बदलांची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यापुढील सार्वत्रिक व पोटनिवडणुकांमध्ये अंमलात येतील, याची नोंद घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

आपला,

१८.०७.२०२४

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:**

१) मा. आयुक्त व मा. सचिव यांचे स्वीय सहायक
२) आयोगातील निवडणूक कार्यासने: का- ५, ६, ७ व ८
३) संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग,
३) निवड नस्ती.

परिशिष्ट- १

# Flaming Torch

# मशाल



परिशिष्ट- २

# Man Blowing Ṭurha
# तुतारी वाजवणारा माणूस

